Maharashtra Governor and Chancellor of the University Jishnu Dev Varma today presided over the Twenty-Eighth Convocation of Dr. Babasaheb Ambedkar Technological University at Lonere, Raigad. Minister of Higher and Technical Education Chandrakant Patil, Guardian Minister of Raigad Bharat Gogawale, Minister for Women and Child Development Aditi Tatkare, Member of Parliament MP Sunil Tatkare Ag. Vice-Chancellor Prof. Rajanish Kamat, and graduating students were present. 3 September 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor presides over SPPU Convocation

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा१२७ वा पदवीप्रदान सोहळा राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज विद्यापीठ परिसरात संपन्न झाला. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी 'आजीवन विद्यार्थी' राहून नवी कौशल्ये आत्मसात करावीत. 'दीक्षांत म्हणजे शिक्षणाचा अंत नव्हे', तर ज्ञानासोबत सामाजिक जबाबदारी स्वीकारण्याचा टप्पा आहे, असे राज्यपालांनी सांगितले. दीक्षांत समारोहाला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, पदवीधारक विद्यार्थी व पालक उपस्थित होते. १० सप्टेंबर २०२६

The 127th Convocation Ceremony of Savitribai Phule Pune University was held today on the university campus in the presence of Maharashtra Governor and Chancellor Jishnu Dev Varma. Secretary to the Governor Dr Prashant Narnaware, Vice Chancellor Prof. (Dr.) Suresh Gosavi; Pro Vice Chancellor Prof. Dr Parag Kalkar, Heads of Department, Faculty and students were present.
10 September 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor presides over Convocation of MUHS

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे संपन्न झाला. दीक्षांत समारोपाला राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे, प्रभारी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, आदी उपस्थित होते. विद्यापीठातर्फे डॉ. सदानंद सरदेशमुख यांना डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली.
२८ जुलै २०२६

The Governor of Maharashtra and Chancellor of universities Jishnu Dev Varma presided over the 25th Convocation of the Maharashtra University of Health Sciences (MUHS) at Nashik. Minister for Food and Drug Administration Narhari Zirwal, President of the All India Institute of Medical Sciences (AIIMS), Nagpur Dr. Anant Pandhare, Vice Chancellor of MUHS Prof. Sanjeev Sonawane and other dignitaries were present. Honorary Doctor of Letters (D.Litt.) was conferred upon Dr. Sadanand Sardeshmukh 28 July 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor presides over Convocation of PAHSU

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २२ वा दीक्षांत समारंभ राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या दीक्षांत प्रांगणात संपन्न झाला. माजी खासदार (राज्यसभा) डॉ. विनय सहस्रबुध्दे यांनी दीक्षांत भाषण केले. दीक्षांत समारोहात पद्मभूषण प्रा. डॉ. जेष्ठराज जोशी यांना डी. एस्सी. तर पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना डी. लिट. ही मानद पदवी देवून सन्मानित करण्यात आले. तसेच १६२ संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी तर ५७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, विविध विष्यशाखांचे विभाग प्रमुख तसेच स्नातक विद्यार्थी समारोहाला उपस्थित होते. ३० जुलै २०२६

The Governor of Maharashtra and Chancellor Jishnu Dev Varma presided over the 22nd Convocation of the Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University in Solapur. Former Rajya Sabha MP Dr. Vinay Sahasrabuddhe delivered the convocation address. Padma Bhushan Prof. Dr. Jyeshtharaj Joshi was conferred the honorary Doctor of Science (D.Sc.) degree, while Padma Shri Girish Prabhune was awarded the honorary Doctor of Letters (D.Litt.) The Governor visited the university's Startup and Entrepreneurship Gallery, where he reviewed innovative research projects and entrepreneurial initiatives undertaken by students and faculty. 30 July 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor confers D.Sc. on CM

राज्यपाल तथा राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एससी.) ही पदवी प्रदान करण्यात आली. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३९ व्या दीक्षांत समारोहामध्ये मुख्यमंत्र्यांना कृषी क्षेत्रामधे डिजिटल तंत्रज्ञानाला चालना दिल्याबद्दल ही मानद पदवी देण्यात आली. राज्यातील आपला पहिला सार्वजनिक कार्यक्रम महान समाज सुधारक व स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले यांचे नाव लाभलेल्या विद्यपीठात होत आहे तसेच या कार्यक्रमात राज्याचे युवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देण्यात येत असल्यामुळे आपल्याकरिता हा दीक्षांत समारोह संस्मरणीय आहे असे राज्यपालांनी सांगितले. १५ मार्च २०२६

In his first public function since coming to Maharashtra, the Governor of Maharashtra and Chancellor of the State's public universities Jishnu Dev Varma conferred the honorary Doctor of Science (D.Sc.) degree upon the Chief Minister of Maharashtra Devendra Fadnavis. The honorary degree was awarded to at the 39th Convocation Ceremony of Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri.

15 March 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor institutes Chancellor's Medal in 3 Universities

राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या निर्देशानुसार मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा येथे 'कुलपती पदक' स्थापन करण्यात आले असून सदर उपक्रमाचा शुभारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत आज लोकभवन, मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते तिन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्रत्येकी १० लाख रुपयांचा धनादेश प्रातिनिधिक रुपात देण्यात आला. राज्यपालांच्या हस्ते 'इन्स्टिट्यूट ऑफ हायर अँड डिजिटल लर्निंग : इंडस्ट्री-अकॅडेमिया कोलॅबोरेशन फॉर इम्प्रूव्हिंग एम्प्लॉयेबिलिटी' या उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला. २ सप्टेंबर २०२६

At the instance of the Governor of Maharashtra and Chancellor of the State Universities Jishnu Dev Varma, the 'Chancellor's Medal' has been instituted at the University of Mumbai, Savitribai Phule Pune University and Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, At a programme held at Lok Bhavan, Mumbai, the Governor presented a representative cheque of Rs. 10 lakh each to the Vice Chancellors of the three universities. The Governor also launched the 'Institute of Higher and Digital Learning: Industry-Academia Collaboration for Improving Employability' initiative. 2 September 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor inaugurates Centre of Innovation

नाविन्यपूर्ण कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी मुंबई येथील ऍटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीने सुरु केलेल्या 'सेंटर फॉर इनोव्हेशन'चे उदघाटन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी संस्थेच्या बीकेसी येथील शैक्षणिक परिसरात केले. यावेळी ओ पी जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीने 'सिरील श्रॉफ सेन्टर ऑफ एआय, लॉ अँड रेग्युलेशन' यांच्या सहकार्याने आयोजित 'गव्हर्निंग एआय : कायदा, तंत्रज्ञान व समाज' या विषयावरील चर्चासत्राचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाला ऍटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीच्या संस्थापिका डॉ इंदू शहानी, कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ शहानी, कुलगुरु डॉ राजन वेळूकर, ओ पी जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीचे कुलगुरु डॉ सी राज कुमार, सिरील श्रॉफ, अपग्रॅडचे अध्यक्ष रॉनी स्क्रूवाला, अध्यापक, निमंत्रित व विद्यार्थी उपस्थित होते. २४ एप्रिल २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma inaugurated the 'Centre for Innovation' launched by ATLAS SkillTech University to promote innovative skill-based education. The Governor also inaugurated a National Seminar on "Governing AI: Law, Technology and Society," organised in collaboration with O P Jindal Global University and the Cyril Shroff Centre for AI, Law and Regulation. Dr. Indu Shahani, Founder Chancellor of Atlas SkillTech University; Siddharth Shahani, Executive President; Dr. Rajan Welukar, Vice-Chancellor; Dr. C. Raj Kumar, Vice-Chancellor of O P Jindal Global University; invitees and students were present. 24 April 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor inaugurates AIU's Centenary AGM

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू)च्या १०० व्या वार्षिक महासभेचे तसेच कुलगुरूंच्या राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ परिसर येथे संपन्न झाले. देशाला २०४७ पर्यंत 'विकसित भारत' घडविण्यासाठी नवोन्मेष व संशोधनासह सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असून या माध्यमातून विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले. उदघाटन सत्राला एआययूचे अध्यक्ष प्रा. डॉ. विनय कुमार पाठक, महासचिव डॉ. श्रीमती पंकज मित्तल, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्रकुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, कुलगुरु डॉ. एन. जे. पवार आदी उपस्थित होते. २८ एप्रिल २०२६

Governor Jishnu Dev Varma presided over the inauguration of the 100th Annual General Meeting of the Association of Indian Universities (AIU) and the National Conference of Vice-Chancellors at the Dr. D. Y. Patil University campus in Pimpri, Pune. President of AIU Prof. Dr. Vinay Kumar Pathak, Secretary General Dr. (Mrs.) Pankaj Mittal, Chancellor of Dr. D. Y. Patil University Dr. P. D. Patil, Pro-Chancellor Dr. Bhagyashree Patil, Vice-Chancellor Dr. N. J. Pawar and other dignitaries were present. 28 April 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor unveils Maharshi Karve statue in Pune

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते पुणे येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या परिसरात थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसुधारक भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. महर्षी कर्वे यांनी सन १९१६ साली स्थापन केलेल्या एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या १११ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यसभा सदस्य डॉ. मेधा कुलकर्णी, विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. उज्ज्वला चक्रदेव, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आदी उपस्थित होते. ५ जुलै २०२६

Maharashtra Governor and Chancellor of the state universities Jishnu Dev Varma unveiled the statue of great educationist and social reformer Bharat Ratna Maharshi Dhondo Keshav Karve at the SNDT University Campus in Pune. The statue was unveiled on the occasion of the 111th Foundation Day of the SNDT Women's University founded by Maharshi Karve in 1916. The Governor visited the Exhibition of 'Innovation Mahakumbh 2.0'. Union Minister of State for Civil Aviation and Cooperation Murlidhar Mohol, Minister of Higher and Technical Education Chandrakant Dada Patil, MP (RS) Medha Kulkarni, Vice Chancellor of the University Prof Ujwala Chakradeo, were present. 5 July 2026


STATE, UT FOUNDATION DAYS





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Maharashtra celebrates Bihar Foundation Day

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे बिहार राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्यपालांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले तसेच सर्वांना राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. बिहारचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल (से.नि.) सय्यद अता हसनैन यांचा संदेश देखील यावेळी दाखविण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमा अंतर्गत लोकभवनातर्फे बिहार राज्य स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बिहारचे राज्यगीत व भोजपुरी गीत सादर केले तसेच मिथिला प्रदेशाचे लोकनृत्य झिझिया व जट-जटिन सादर केले. २३ मार्च २०२६

The State Foundation Day of Bihar was celebrated in presence of Maharashtra Governor Jishnu Dev Varma at Maharashtra Lok Bhavan in Mumbai Governor Jishnu Dev Varma addressed the students on the occasion. The video message of Bihar Governor Lt Gen Syed Ata Hasnain was screened on the occasion. The State Formation Day of Bihar was organised as part of the 'Ek Bharat Shreshtha Bharat' initiative of Government of India. 23 March 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Rajasthan & Odisha State Foundation Day Celebrated

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत लोकभवन मुंबई येथे राजस्थान आणि ओडिशा राज्यांचा राज्य स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम मुंबई महानगर पालिकेच्या संगीत कला अकादमीच्या सहकार्याने सादर करण्यात आला. यावेळी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या राजस्थान व ओडिशा राज्यांच्या लोकगीत व नृत्याला राज्यपालांनी भरभरुन दाद दिली. भारत सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा अंतर्गत राजस्थान आणि ओडिशा राज्य स्थापना दिवस लोकभवन येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजेश्री शिरोडकर, समितीचे सदस्य, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) डॉ अविनाश ढाकणे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे व पालिकेच्या उपायुक्त (शिक्षण) डॉ प्राची जांभेकर उपस्थित होते. १७ एप्रिल २०२६

The State Foundation Days of Rajasthan and Odisha were jointly celebrated through cultural presentation in presence of Maharashtra Governor Jishnu Dev Varma at Lok Bhavan Mumbai. The cultural programme was presented by the Sangeet Kala Academy of Brihanmumbai Municipal Corporation. Chairperson of the BMC Education Committee Rajeshree Shirodkar, committee members, Additional Municipal Commissioner (Education) Dr. Avinash Dhakne, Secretary to the Governor Dr. Prashant Narnaware, Comptroller of the Governor's Household Dr. Nishikant Deshpande and Deputy Municipal Commissioner (Education) Dr. Prachi Jambhekar were present. 17 April 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Lok Bhavan Celebrates Maharashtra & Gujarat Foundation Day

महाराष्ट्र व गुजरात राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र लोकभवन मुंबई येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा व त्यांच्या पत्नी सुधा देव वर्मा यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राज्य स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात महाराष्ट्रातील पद्म पुरस्कार विजेत्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अमरवाणी फाउंडेशन आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात शांतनू हेर्लेकर, उपग्ना पंड्या आणि अभिमन्यू हेर्लेकर यांनी मराठी व गुजराती लोकगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. पद्मभूषण उदय कोटक, पद्मश्री अशोक खाडे, कलाकार पद्मश्री भिकल्या ढिंडा, पद्मश्री जुझर वासी, अभिनेते आर. माधवन तसेच सत्यनारायण नुवाल यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी न्यायाधीश डॉ. मदन महाराज गोसावी, उद्योजक निखिल मर्चंट, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. १ मे २०२६

The Foundation Day of of Maharashtra and Gujarat was celebrated in the presence of Governor Jishnu Dev Varma and Sudha Dev Varma at Maharashtra Lok Bhavan. The State Foundation Day was celebrated as part of the 'Ek Bharat Shreshtha Bharat' initiative of Government of India. Padma Awardees from Maharashtra were felicitated by the Governor on this occasion. A cultural programme organised by Amarvani Foundation featured performances by Shantanu Herlekar, Upagna Pandya, and Abhimanyu Herlekar, who presented Marathi and Gujarati folk songs. Padma Bhushan Uday Kotak, Padma Shri Ashok Khade, artist Padma Shri Bhiklya Dhinda, Padma Shri Juzer Wasi, actor R Madhavan and Satyanarayan Nuwal were felicitated by the Governor. 1 May 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Maharashtra celebrates Telangana Foundation Day

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्य स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. 'वर्मा फाउंडेशन' आणि 'फेडरेशन ऑफ तेलुगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' (F-TAM) यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात संस्थेतील काही कलाकारांनी लोकगीते व लोकनृत्य सादर केले. विविध राज्यांमध्ये राज्य स्थापना दिवस साजरे केल्यामुळे त्या त्या राज्यांच्या संस्कृती व परंपरेचे दर्शन होते व त्यातून राष्ट्रीय एकात्मता बळकट होते असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाचे (NCLT) माजी न्यायिक सदस्य न्यायमूर्ती (निवृत्त) मदन गोसावी, सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते राम गोपाल वर्मा, वर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष पी. यू. एन. वर्मा, 'मराठी- तेलुगू मंच'चे संस्थापक आणि 'फेडरेशन ऑफ तेलुगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र'चे अध्यक्ष जगन बाबू गंजी, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, नेल्लोर येथील नाट्य शिरोमणी नादिया, तसेच तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील विविध संस्थांचे सदस्य उपस्थित होते. ३ जून २०२६

The State Foundation Day of Telangana was celebrated through cultural performances at Maharashtra Lok Bhavan, Mumbai. in the presence of Maharashtra Governor Jishnu Dev Varma presided. The programme was. organised in collaboration with the Verma Foundation and the Federation of Telugu Associations of Maharashtra (F-TAM) The programme featured folk songs and traditional dances of Telangana, Speaking on the occasion the Governor Jishnu Dev Varma said that celebrating the State Foundation Days of different States provides an opportunity to appreciate their unique cultures and traditions and helps strengthen the spirit of national integration. 3 June 2026







SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Sikkim & Goa Foundation Day celebrated in Maharashtra

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे सिक्कीम व गोवा राज्य स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात विद्यापीठाच्या तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सिक्कीम व गोवा राज्यांची लोकगीते लोकनृत्यासह सादर केली. कार्यक्रमाला कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ अपूर्वा पालकर, राज्यपालांचे सहसचिव एस राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे व मुंबईत शिक्षण व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले सिक्कीमचे लोक उपस्थित होते.

१ जून २०२६

The State Foundation Days of Sikkim and Goa were celebrated through cultural performances at Maharashtra Lok Bhavan in the presence of Maharashtra Governor Jishnu Dev Varma. Organised in collaboration with the Ratan Tata Maharashtra State Skills University, the programme featured students of the University presenting folk songs and traditional dances of Sikkim and Goa, showcasing the cultural heritage of the two States. Speaking on the occasion, Governor Jishnu Dev Varma said that celebrating the State Foundation Days of different States provides an opportunity to appreciate their unique cultures and traditions and helps strengthen the spirit of national integration. 1 June 2026


EVENTS



Red Cross office bearers call on Governor

इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या महाराष्ट्र शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यपाल तथा संस्थेचे मुख्य आश्रयदाते जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन संस्थेच्या महाराष्ट्र शाखेच्या कार्याची माहिती दिली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश देवरा, संस्थेच्या बेल-एयर संस्थेचे मानद वैद्यकीय संचालक डॉ. प्रेम नाथ, मानद कोषाध्यक्ष मेहली गोलवाला, मानद सचिव व महाराष्ट्र स्टेट अँटी टीबी असोसिएशनचे तांत्रिक सल्लागार डॉ. यतीन धोलाकिया, महाराष्ट्र रेड क्रॉसचे मानद सचिव टी. बी. सकलोथ व कार्यकारी सचिव चार्ल्स पाल उपस्थित होते. ५ मे २०२६


Office bearers of the Maharashtra Branch of the Indian Red Cross Society called on the Governor of Maharashtra and Chief Patron of the Society Jishnu Dev Varma at Lok Bhavan, Mumbai. They apprised the Governor about the activities of the Maharashtra State Branch of the IRCS. Vice Chairman Suresh Deora, Honorary Medical Director of Bel-Air Dr. Prem Nath, Honorary Treasurer Mehli Golwala, Honorary Secretary of the Society and Technical Advisor to the Maharashtra State Anti-TB Association Dr. Yatin Dholakia, Honorary Secretary of Maharashtra Red Cross T. B. Sakloth, and Executive Secretary Charles Paul were present. 5 May 2026



Governor chairs meeting on Ex-Servicemen's Special Fund

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची पन्नासावी वार्षिक बैठक लोकभवन मुंबई येथे संपन्न झाली. बैठकीमध्ये माजी सैनिक तसेच सैन्यदलातील हुतात्म्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासंबंधी विविध विषयांवर चर्चा झाली. सैनिक कल्याण विभागाच्या राज्यातील विविध मालमत्तांचे व्यवस्थापन, ध्वज निधीचा विनियोग, सैनिक विद्यार्थी वसतीगृहांची सद्यस्थिती व इतर सोयीसुविधा आदी विषयांवर यावेळी चर्चा झाली. बैठकीला पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सा.प्र.वि.चे प्रधान सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख ले. जन. डी.एस. कुशवाहा, रिअर एडमिरल शांतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक व विशेष निधी समितीचे सदस्य उपस्थित होते. १२ मे २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma presided over the 50th Annual Meeting of the State Managing Committee of Special Fund (Maharashtra) for the Reconstruction and Rehabilitation of Ex Servicemen at Lok Bhavan, Mumbai. The meeting discussed various issues relating to the welfare of ex servicemen, war widows and their family members. Minister of Tourism, Mining and Ex-servicemen Welfare Shambhuraj Desai, Additional Chief Secretary GAD Santosh Kumar, GOC Maharashtra, Gujarat and Goa area, Lt. Gen DS Kushwah, Flag Officer Commanding Maharashtra Gujarat Naval Area Rear Admiral Shantanu Jha, Air Officer Commanding HQ MAO Air Vice Marshal PS Wadodkar, were present. 12 May 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor visits Asiatic Society

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईतील ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथसंग्रहालयाला भेट देऊन तेथील ग्रंथसंपदा, दुर्मिळ दस्तावेज, सोपारा येथील अवशेष, नकाशे व दुर्मिळ नाण्यांची पाहणी केली. यावेळी राज्यपालांनी एशियाटिक सोसायटीला २० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. संस्थेचे अध्यक्ष डॉ विनय सहस्रबुद्धे तसेच विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ भालचंद्र मुणगेकर यांनी राज्यपालांना संस्थेच्या कार्याची माहिती दिली. राज्यपाल एशियाटिक सोसायटीचे आश्रयदाते आहेत. १८ ऑगस्ट २०२६

The Governor of Maharashtra Jishnu Dev Varma visited the historic library of the Asiatic Society in Mumbai and reviewed its rich collection of books, rare documents, archaeological artefacts from Sopara, maps, and rare coins. The Governor announced a donation of ₹20 lakh to the Asiatic Society. President of the Asiatic Society Dr. Vinay Sahasrabuddhe and Chairman of the Board of Trustees Dr. Bhalchandra Mungekar briefed the Governor about the Society's activities and introduced him to the newly elected members of the Managing Committee and the Scrutiny Committee. The Governor is the Chief Patron of the Society. 18 August 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor inaugurates Woodcraft Exhibition

मतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्याची माहिती दिली. काष्ठ कलाकृतींचे प्रदर्शन दिनांक १८ मे पर्यंत सर्वांसाठी खुले आहे. १८ मे २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma visited an exhibition of woodcraft organised by noted social worker Shankarbaba Papalkar, at P L Deshpande Academy in Mumbai. Shankarbaba who has been running a shelter home for mentally challenged and orphan children in Amravati district. The Governor viewed the wooden sculptures and artistic under Shankarbaba's guidance. creations made by differently-abled young artists. He interacted with the artists and appreciated the service being carried out by Shankarbaba Papalkar. The woodcraft exhibition will remain open to the public till 18 May. 18 May 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor attends Divyang Empowerment Summit

हेतू चॅरिटेबल ट्रस्ट व डिस्ट्रिक्ट लीगल सर्विसेस ऑथॉरिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग सक्षमीकरण परिषदेचे उद्घाटन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मालाड मुंबई येथे संपन्न झाले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते दिव्यांग महिलांना शिलाई मशीन, दृष्टिहीन व्यक्तींना AI स्मार्ट चष्मे, व्हीलचेयर, लॅपटॉप वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्याम चांडक व न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) के. के. तातेड, हेतु चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव रिखब चंद जैन, उद्योजक प्रवीण कोठारी, आदी उपस्थित होते. ३० मे २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma presided over the Divyang Empowerment Summit, jointly by the Hetu Charitable Trust in association with District Legal Services Authority at Malad, Mumbai. The Governor distributed sewing machines to divyang women, AI-powered smart glasses to visually impaired persons, wheelchairs, to Divyang persons, and laptops to other beneficiaries to promote empowerment and self-reliance among Divyang persons. Minister of Skill Development Mangal Prabhat Lodha, Justice Shyam Chandak and Justice Makarand Karnik, judges of the Bombay High Court, Justice (retd.) K. K. Tated and Secretary of Hetu Trust Rikhab Chand Jain were present. 30 May 2026

VISITS & PROGRAMMES



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor, CM participate in Kargil Vijay Diwas

राज्यपाल जिष्णु देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकभवन, मुंबई येथे कारगिल विजय दिवस स्मरणोत्सव व कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्या हस्ते वीर माता, वीर पिता, वीर नारी, कारगिल युद्धात अपंगत्व आलेले वीर जवान तसेच शौर्य पदक विजेत्या जवानांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात कवी प्रदीप यांच्या रचनेवर आधारित भरत बळवल्ली यांच्या गीताचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, पर्यटन व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, तसेच सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालयाने वीर सेनानी फाउंडेशन तसेच स्वरनिनाद फाउंडेशन यांच्या सहकार्याने केले होते. यावेळी नौदलाच्या बँड पथकाने राष्ट्रभक्तीपर गीताच्या धून सादर केल्या तसेच नचिकेत देसाई व शिवम या गायकांनी देशभक्तीपर गीते सादर केली. २७ जुलै २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma and Chief Minister Devendra Fadnavis the Kargil Vijay Diwas celebration and felicitated the Veer Naris, Veer Matas, Veer Pitas, Jawans injured in the Kargil War and recipients of Gallantry Medals at Lok Bhavan, Mumbai. The Governor released a musical composition based on the lyrics of Kavi Pradeep and rendered by Bharat Balvalli. Deputy Chief Minister Eknath Shinde, Deputy Chief Minister Sunetra Pawar, Minister for Cultural Affairs Adv. Ashish Shelar, Minister for Tourism and Ex-Servicemen Welfare Shambhuraj Desai, and senior officers of the armed forces were present. 27 July 2026



SCAN TO WATCH
HIGHLIGHTS

Governor releases book on Climate Change

राज्याचे माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी लिहिलेल्या 'क्लायमेट चेंज, एक चक्रव्यूह' या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लोकभवन, मुंबई येथे पार पडले. जागतिक वातावरण बदल या विषयावर विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखांचे अध्ययन करुन सदर पुस्तक संकलित केले असल्याचे डॉ. सावंत यांनी यावेळी सांगितले. या पुस्तकामध्ये हवामान बदलाचा चक्रव्यूह, हवामान बदल आणि हवामान बदल आणि अन्नसुरक्षा, कुपोषण आणि हवामान बदल आदी प्रकरणाचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. १ जुलै २०२६

A book titled 'Climate Change: Ek Chakravyuh' authored by former Maharashtra Minister Dr. Deepak Sawant was released by State Governor Jishnu Dev Varma in the presence of Deputy Chief Minister Eknath Shinde at Lok Bhavan, Mumbai. According to the author, the book is based on national and international research articles and publications on the subject of global climate change. 1 July 2026





GOVERNOR SPEECH

SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor unfurls Tricolour on Maharashtra Day

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान मुंबई येथे झालेल्या मुख्य शासकीय सोहळ्यात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली व उपस्थितांना संबोधित केले. यावेळी राज्यपालांनी समारंभीय संचलनाचे निरीक्षण केले तसेच संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. या मुख्य शासकीय सोहळ्याला राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मुंबईच्या महापौर रितु तावडे, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत, मानद वाणिज्यदूत, सशस्त्र सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रशासन व पोलीस दलातील सेवानिवृत्त अधिकारी व नागरिक उपस्थित होते. १ मे २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma unfurled the National Tricolour on the occasion of the 67th Maharashtra State Foundation Day at the State function held at Chhatrapati Shivaji Maharaj Park in Mumbai. The Governor inspected the Ceremonial Parade and accepted a salute from the marching columns. Spouse of the Governor Smt Sudha Dev Varma, Chief Minister Devendra Fadnavis, Chairman of Maharashtra Legislative Council Prof Ram Shinde, Mayor of Mumbai Ritu Tawde, Consuls General and Honorary Consuls of various countries in Mumbai and senior officers of the Armed Forces, Civil, Police and Fire Services and citizens were present. 1 May 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Maharashtra Governor launches Census 2027

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलेल्या स्व-गणेनेने देशातील पहिल्या डिजिटल जनगणनेचा 'जनगणना २०२७'चा महाराष्ट्रातील औपचारिक आरंभ लोकभवन मुंबई येथे झाला. महाराष्ट्र स्थापना दिनी जनगणना सुरु होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी राज्यातील जनतेला जनगणनेच्या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. ही स्व-गणना दिनांक १ ते १५ मे या कालावधीत होणार असून त्यानंतर जनगणना कर्मचारी घरोघरी जाणार आहेत. ही स्व-गणना प्रत्येक नागरिकाला स्वत:ला करायची असून त्यामध्ये ३३ प्रश्नाची उत्तरे द्यायची आहेत. अवघ्या दहा मिनिटात स्व-गणना करता येते राज्यातील २.६ लाख कर्मचारी जनगणना करणार आहेत, अशी माहिती प्रधान जनगणना अधिकारी डॉ. (श्रीमती) निरुपमा जे. डांगे यांनी यावेळी दिली. यावेळी राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, आदी उपस्थित होते १ मे २०२६

The first ever digital Census of India - Census 2027 for the State of Maharashtra was launched by State Governor Jishnu Dev Varma at Lok Bhavan, Mumbai. Expressing happiness that the Census exercise for Maharashtra has commenced on Maharashtra Day, the Governor appealed to the people to actively participate in this national exercise. Spouse of the Governor Sudha Dev Varma, Chief Principal Census Officer of Maharashtra Dr. Nirupama J. Dange and Additional Municipal Commissioner (Western Suburbs) Dr. Vipin Sharma, were among those present. 1 May 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor pays tribute to Chhatrapati Shivaji Maharaj

राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्या दिवशी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दादर मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महापौर रितू तावडे देखील उपस्थित होत्या. ११ मार्च २०२६

On the first day after assuming office, Maharashtra Governor Jishnu Dev Varma offered floral tributes to the equestrian statue of Chhatrapati Shivaji Maharaj at Dadar, Mumbai. Mayor of Mumbai Ritu Tawde was also present. 11 March 2026





Governor visits Chaityabhoomi

राज्यपाल पदाची शपथ घेतल्यानंतर राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी चैत्यभूमी मुंबई येथे जाऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत त्रिशरण बुद्ध वंदना करण्यात आली. मुंबईच्या महापौर रितू तावडे, भन्ते राहुल बोधी महाथेरो, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे महासचिव नागसेन कांबळे यावेळी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेचे प्रताप कांबळे, आदी यावेळी उपस्थित होते. ११ मार्च २०२६

A day after assuming charge of Maharashtra, Thereafter, the Governor Jishnu Dev Varma visited Chaityabhoomi and paid floral tributes at the memorial of the architect of the Constitution Bharat Ratna Dr. B. R. Ambedkar in Mumbai. The Trisharan Buddha Vandana was recited in the presence of the Governor. Mumbai Mayor Ritu Tawde, Bhante Dr Rahul Bodhi Mahathero, General Secretary of the Dr Babasaheb Ambedkar Mahaparinirvan Din Samanvay Samiti Nagasen Kamble were present. 11 March 2026



Governor visits Savarkar Memorial

राज्याच्या राज्यपाल पदाची शपथ घेतल्यानंतर राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक येथे भेट दिली व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. स्मारकाच्या वतीने राज्यपालांना सावरकरांची प्रतिमा तसेच सावरकर ग्रंथ भेट देण्यात आले. ११ मार्च २०२६

A day after assuming the charge in Maharashtra, Governor Jishnu Dev Varma also visited the Swatantryaveer Savarkar National Memorial and paid floral tributes to the bust of Vinayak Damodar Savarkar. The Governor was presented with a memento of Veer Savarkar as well as books on Savarkar. 11 March 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor inaugurates integrated probationers' training at YASHADA

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे येथे सुरु असलेल्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. उदघाटन सत्राला राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे आदी उपस्थित होते. १० सप्टेंबर २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma inaugurated the Integrated Probationers' Training Programme at the Yashwantrao Chavan Academy of Development Administration (YASHADA) in Pune. Director General of YASHADA Dr. Suhas Diwase, and Secretary to the Governor Dr. Prashant Narnaware, were among those present. 10 September 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

NDC Delegation meets Governor

महाराष्ट्राच्या अभ्यास दौऱ्यावर आलेल्या नॅशनल डिफेन्स कॉलेज येथे प्रशिक्षण घेत असलेल्या भारत तसेच मित्र देशातील वरिष्ठ सैन्य दल व नागरी सेवा अधिकाऱ्यांच्या एका १७ सदस्यांच्या शिष्टमंडळाने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे भेट घेतली. शिष्टमंडळामध्ये भारतीय नौदल, वायुदल व स्थलसेनेतील अधिकारी तसेच राजस्व सेवेतील अधिकारी उपस्थित होते. त्याशिवाय रशिया, ओमान, इंडोनेशिया, नायजेरिया, नेपाळ व टांझानिया या मित्र देशांचे वरिष्ठ सैन्य अधिकारी देखिल उपस्थित होते. नॅशनल डिफेन्स कॉलेज येथील वरिष्ठ सल्लागार मेजर जनरल हरकिरत सिंह (सेवा निवृत्त) यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. १७ मार्च २०२६

A 17-member delegation of senior military and civil service officers from India and friendly countries, undergoing training at the National Defence College, called on Governor Jishnu Dev Varma at Lok Bhavan during their study tour of Maharashtra. The delegation included officers from the Indian Navy, Air Force, and Army, as well as senior military officers from Russia, Oman, Indonesia, Nigeria, Nepal, and Tanzania 17 March 2026



WATCH HIGHLIGHTS

Governor presents 'Drivers of Change' Awards 2026

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबई येथे १५ युवा उद्योजकांना 'ड्रायव्हर्स ऑफ चेंज' पुरस्कार प्रदान केले. इंडिया टुडे समूह व महिंद्रा यांच्यातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला इंडिया टुडेचे समूह संपादकीय संचालक राज चेंगप्पा, महिंद्रा ऑटोमोटिव्ह डिव्हिजनचे मुख्य अधिकारी नलिनीकांत गोलगुंठा, युवा पुरस्कार विजेते व त्यांचे कुटुंबीय तसेच निमंत्रित उपस्थित होते. युवा उद्यमी नव्या नवेली नंदा, गझल अलघ - वरुण अलघ, बोधिसत्व संघप्रिय, प्रणव वेम्पटी, नारायण सुब्रमण्यम व नीरज राजमोहन, अग्नीश्वर जयप्रकाश, राधिका गुप्ता, माधव कृष्ण सतार वादक मेहताब अली नियाजी, अभिनेत्री मोना सिंग व जेनेलिया देशमुख यांना यावेळी सन्मानित करण्यात आले. २४ मार्च २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma presented the India Today Group–Mahindra 'Drivers of Change' Awards 2026 to 15 young startup leaders at a function in Mumbai. The function was organised by the India Today Group in association with Mahindra & Mahindra. Group Editorial Director, India Today Group Raj Chengappa, CEO of Mahindra Automotive Division Nalinikanth Gollagunta, members of the jury, awardees, their families and other invitees were present. 24 March 2026



‘Reducing plastic footprint’

संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागातर्फे आयोजित 'प्लास्टिक उत्पादने व प्लास्टिक पॅकेजिंग आवरणांचा पर्यावरणावरील दुष्परिणाम' या विषयावरील तज्ज्ञांच्या बैठकीला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी हॉटेल ताज महाल पॅलेस मुंबई येथे संबोधित केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते ‘वर्क इन प्रोग्रेस: रिड्युसिंग द प्लास्टिक फूटप्रिंट ऑफ प्रॉडक्ट्स अँड पॅकेजिंग’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. शाश्वततेशिवाय झालेल्या विकासाला 'विकास' म्हणता येणार नाही असे सांगून राज्यपालांनी प्लास्टिक प्रदूषणाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी शासन, उद्योग जगत, आणि नागरिकांना एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.
२७ मार्च २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma presided over a Consultative Meeting of experts on 'Reducing Plastic Footprint' at Hotel Taj Mahal Palace in Mumbai. The meeting was organised by the United Nations Environment Programme (UNEP). The Governor released the publication 'Work in Progress : Reducing the Plastic Footprint of Products and Packaging' on the occasion. Stating that development without sustainability is no development, the Governor called for collective efforts by the Government, Industry, Corporates and civil society to address the serious challenge of plastic pollution. 27 March 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor graces FICCI's 99th Foundation Day

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI) या संस्थेचा ९९ वा स्थापना दिवस राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते फिक्कीच्या माजी अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. पुढील वर्षी फिक्की शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. कार्यक्रमाला राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, फिक्कीचे अध्यक्ष अनंत गोयंका, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय शंकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, संस्थेच्या महासंचालक ज्योती वीज आदी उपस्थित होते. ७ एप्रिल २०२६

The Governor of Maharashtra Jishnu Dev Varma presided over the 99th Foundation Day of the Federation of Indian Chambers of Commerce and Industry (FICCI) and felicitated its past presidents in Mumbai. FICCI started in Mumbai at the instance of Mahatma Gandhi, will be celebrating its Centenary in the year 2027. Minister of Protocol Jaykumar Rawal, President of FICCI Anant Goenka, Senior Vice President Vijay Sankar, and captains of Industry were present. 7 April 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor presents Newsmakers Achievers' Awards

ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर, पार्श्वगायक हरिहरन, शेफ संजीव कपूर, अभिनेत्री सुषमा देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे तसेच बीड जिल्ह्यात एचआयव्ही / एड्सग्रस्त बालकांच्या संगोपन व पुनर्वसनासाठी कार्यरत असलेले समाजसेवक दत्ता बरगजे आणि संध्या बरगजे यांना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते 'लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. आफ्टरनून व्हॉईसतर्फे आयोजित '१८वा न्यूजमेकर्स अचिव्हर्स अवॉर्ड्स' या सोहळ्यास भरतनाट्यम नृत्यांगना डॉ. संध्या पुरेचा, अभिनेते व जाहिरात क्षेत्रातील तज्ज्ञ भरत दाभोळकर, आफ्टरनून व्हॉईसच्या संपादक डॉ. वैदेही तमन, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. १ मे २०२६

Veteran playback singer Usha Mangeshkar, ghazal and playback singer Hariharan, celebrity chef Sanjeev Kapoor, actress Sushma Deshpande, senior journalist Rahee Bhide, and social workers Datta Bargaje and Sandhya Bargaje were honoured with the Lifetime Achievement Award by Governor Jishnu Dev Varma in Mumbai. The awards were presented at the '18th Newsmakers Achievers' Awards ceremony, organised by Afternoon Voice Renowned Bharatanatyam exponent Dr. Sandhya Purecha, actor and advertising guru Bharat Dabholkar, Editor of Afternoon Voice Dr. Vaidehi Taman, were among those present. 1 May 2026





Governor inaugurates Solar Energy Project in Nagpur

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन, नागपूर येथे अत्याधुनिक सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन केले. प्रकल्पाची क्षमता ९० किलोवॅट असून त्यातून दरवर्षी सुमारे १,१५,२०० युनिट्स स्वच्छ वीज निर्मिती होईल. कार्यक्रमाला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे परिवार विभागीय महाव्यवस्थापक (महाऊर्जा) सारंग महाजन तसेच अभियंते अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. १६ एप्रिल २०२६

Governor of Maharashtra Jishnu Dev Varma inaugurated a state-of-the-art solar energy project at Lok Bhavan, Nagpur. The project has a capacity of 90 kW and is expected to generate approximately 115,200 units of clean electricity annually. Secretary to the Governor Dr. Prashant Narnaware, Divisional General Manager (MAHAURJA) Sarang Mahajan officers, and staff were present. 16 April 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor launches mobile clinic and ambulance service

पालघर जिल्ह्यातील ओसरवीरा येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी फिरते दवाखाने आणि रुग्णवाहिका सेवांचे लोकार्पण केले. भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करताना समाजातील अंतिम घटकाचा विकास करणे व त्या घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. पालघरच्या सर्वांगीण विकासाशिवाय विकसित भारताचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन राज्यपालांनी डहाणू येथे केले. यावेळी भारत विकास संगमचे संरक्षक संजय पटेल, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड, वनबंधू ट्रस्टचे अध्यक्ष आणि विश्वस्त लाडूलाल सोनी, योगायतन ग्रुपचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रताप सिंह, ज्येष्ठ समाजसेवक सुशील सिंघानिया आदी उपस्थित होते. १९ एप्रिल २०२६

Governor Jishnu Dev Varma inaugurated mobile clinics and ambulance services for tribal and remote areas of Palghar district at Osarvira village, Dahanu taluka, under the joint initiative of Vanbandhu Trust and Bharat Vikas Sangam. While envisioning India as a developed nation, it is imperative to uplift the last segment of society and bring them into the mainstream. Without the holistic development of Palghar, the dream of a Viksit Bharat cannot be fulfilled, stated Maharashtra Governor Jishnu Dev Varma at Dahanu. 19 April 2026



CM, ministers call on Governor

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेसह महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ तसेच आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे देखील उपस्थित होते. ९ जून २०२६

Chief Minister of Maharashtra Devendra Fadnavis accompanied by Deputy Chief Minister Eknath Shinde called on the Governor of Maharashtra Jishnu Dev Varma at Lok Bhavan, Mumbai. Minister for Tribal Development Dr. Ashok Uike, Minister for Food and Drug Administration Narhari Zirwal, and Minister of State for Tribal Development Indranil Naik were also present on the occasion. 9 June 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor attends Marathi Journalists' Convention

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थित मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित 'महा पत्रकार अधिवेशन' पार पडले. पत्रकारांनी सामान्य नागरिक तसेच समाजातील वंचित घटकांच्या समस्या सातत्याने प्रकाश झोतात आणाव्या असे राज्यपालांनी आवाहन केले. याप्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, गौर गोपाल दास, सकाळ मीडिया समूहाचे समूह संपादक निलेश खरे, ज्येष्ठ पत्रकार सरिता कौशिक आणि मृणालिनी नानिवडेकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, पत्रकार संघटनेचे पदाधिकारी तसेच राज्यभरातील विविध भागांतून आलेले पत्रकार उपस्थित होते. ९ जून २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma called upon journalists to continue highlighting the concerns of ordinary citizens and marginalized sections of society. The Governor was addressing a Convention of Journalists organised by the Marathi Patrakar Sangh in Mumbai. Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar, Gaur Gopal Das, Group Editor of Sakal Media Group Nilesh Khare, senior journalists Sarita Kaushik and Mrunalini Nanivadekar, Secretary to the Governor Dr. Prashant Narnaware, State President of the Marathi Patrakar Sangh Kiran Joshi and journalists were present. 9 June 2026



SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor inaugurates Technology & Innovation Workshop

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे 'तंत्रज्ञान संक्रमण आणि नवोपक्रम गतीवर्धक' (Technology Transition and Innovation Accelerator) या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी कार्यशाळेच्या निमित्ताने तयार केलेल्या 'हॅन्ड-बुक' चे राज्यपाल आणि इतर मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. उदघाटन सत्राला ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुनील भिरूड, कॅनियस इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पिंपरकर यांसह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक आणि विद्यार्थी उपस्थित होते. १० जून २०२६

Maharashtra Governor Jishnu Dev Varma inaugurated an International Workshop on "Mid-TRL Technology Transition and Innovation Acceleration" at Pune International Centre in Pune. The 3 day Workshop was jointly organised by the CoEP Technological University and CANEUS International. Science leader Dr Raghunath Mashelkar, Vice-Chancellor of CoEP Technological University Prof Sunil Bhirud, Founder Chairman of CANEUS International Milind Pimprikar, experts, researchers, entrepreneurs and students were present. The Governor released a Handbook brought out for the workshop on the occasion. 10 June 2026





SCAN TO WATCH HIGHLIGHTS

Governor presides over MIFF Closing Ceremony

